**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

**(सकाळ)**

जा.क्र. ५१९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०७/२०१७

**१) ट्रक चालकांने मोटार सायकला कट मारुन एक इसमास जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/०७/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील फिर्यादी युसुफ वल्द सुलतान खान वय ६५ वर्ष, रा. चिखला व जखमी वाशिम बसीर खान वय १९ वर्ष, रा. चिखला हे मोटार सायकल क्र. एमएच ३६/२७६१ ने चिखला माईन्स येथुन तुमसर बाजार करने कामी गेले होते बाजार करुन परत येत असता बघेडा फाटा ते गोबरवाही दरम्यान राज्य मार्ग क्र. २७२ वर फिर्यादीचे मोटार सायकला अज्ञात ट्रक चालकाने कट मारल्याने मोटार सायकल वरुन खाली पडल्याने मागे बसलेला जखमी वसीम याचा उजवा पाय टोंगऱ्या पासुन फॅक्चर झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) अज्ञात आरोपीने स्वीप्ट गाडी व ट्रकचे नुकसान करण्याचे उद्‌देशाने आग लावुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/०७/२०१७ चे ०१.०० वा. दर. यातील फिर्यादी दिपक नामदेवराव वानखेडे वय ३५ वर्ष, रा. शिवाजी वार्ड साकोली याची मारोती स्वीप्ट कार क्र. एमएच ३६ ए. ए. ७२९६ व आयसर कंपनीचा ट्रक क्र. एमएच ३६ अअ ००७९ हे घरमालकाचे घराचे समोर पार्कींग करुन ठेवले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने नुकसानी करण्याच्या उद्‌देशाने आग लावल्याने फिर्यादीची स्वीप्ट गाडी जळाल्याने ७ लाख रुपयाचे व फिर्यादीचे घरमालकीच्या मुलाचा ट्रक जळाल्याने १८ लाख रुपयाचे असे एकुण २५ लाख रुपयाचे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४३५ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) पावसामुळे साठलेल्या पाण्याची व चिखलाची विल्हेवाट लावण्याकामी एकाएकी अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/०७/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील फिर्यादी हा ग्रामपंचायत बांपेवाडाचा सरपंच असुन आरोपी याने पावसामुळे साठलेल्या पाण्याची व चिखलाची विल्हेवाट लावने कामी दिलेल्या अर्जाचे अनुसंगाने घटनास्थळी फिर्यादी व ग्रामपंचायत चे अन्य सदस्य सोबत पोलीस पाटील यांच्या सह जाऊन पाण्याची व चिखलाची विल्हेवाट लावण्याकामी जवळपासच्या लोकांशी फिर्यादी चर्चा करी असता आरोपीस फिर्यादी हा महार जातीचा आहे हे माहीत असुन सुध्दा एकएकी फिर्यादीचे अंगावर जाऊन त्याचे कॉलर पकडुन खाली पाडुन लाताबुक्यांने मारपीट करुन अश्लिल व जातीवाचक शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने तसेच फिर्यादीस वाचविण्यास आलेला नरेश नंदलाल हेमणे वय ४४ वर्ष, याला सुध्दा मारपीट केल्याने फिर्यादी घनशाम जयराम मेश्राम वय ४९ वर्ष, रा. बापेवाडा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,३२३,५०४,५०६ भादंवि.सहकलम३(१)(आर)(एस),३(२),५(अ)अ.जा.ज.अ.प्र सुधारीत का. अधिनीयम २०१५ श्री. मा. विक्रम साळी उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर अतीरिक्त कार्यभार साकोली हे करीत आहेत.

**४) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकला स्वार जखमी . :–**

दिनांक १९/०७/२०१७ चे ००३० वा. दर. यातील फिर्यादी प्रफुल कन्हैया जांभुळकर वय २५ वर्ष, रा. बेला जखमी हा मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ एच ९९३१ ने बेला येथे जात असतांना समोरुन येणाऱ्या अज्ञात आरोपी ट्रक चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने भरधाव वेगाने चालवुन जखमीचे मोटार सायकला सेंटपीटर शाळेच्या गेट समोर बेला येथे धडक मारुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. नागोसे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) बोलेरो पिकअपचे वाहनात गोमासाची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २७/०३/२०१७ चे १४.१० वा. दर. यातील फिर्यादी निलज सुरेश भोले वय ४० वर्ष, रा. गजानन हाउसिंग सोसायटी सेमिनरी हिल्स नागपुर याने गुप्त माहीती व्द्रारे मिळालेल्या खबरे वरुन आरोपी बोलेरो पिकअपचे चालकाने आपले ताब्यातील वाहनात गोमास अंदाजे दिड किलो गोमास अंदाजे किंमती १५० /–रु. चा वाहतुक करतांनी मिळुन आल्याने फॉरेसिक रिपोर्ट व फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ९(अ) महा. प्राणी सं. अधि. २०१५. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. थेरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) बिना पास परवाना रेतीची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/०७/२०१७ चे १४.३० वा. दर. यातील बिना नंबरचे स्वाराज कंपनीचे ट्रॅक्टर चालक मालकाने चिथावनी देवुन बिना पास परवाना रेतीची चोरटी वाहतुक करतांनी मिळुन आल्याने एक स्वराज कंपनीच्या ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये १ ब्रास रेती किंमती १५००/–रु. ची भरुन मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९,१०९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक १९/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडार, कारधा, तुमसर, लाखांदुर व जवाहरनगर येथे अवैध दारु/अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २२ लिटर हातभट्टी दारु + ३५० किलो सडवा+ साहित्य किंमती १८,२००/–रु. व ३ लिटर ६०० मिली लिटर देशी दारु किंमती १०४०/–रु. तसेच जुगारातुन किंमती १४५५/–रु. असा एकुण किंमती २०,६९५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**पोउपनि. जे. एन. लाकडे**
**नियत्रंण कक्ष अधिकारी**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र.९४०३४३८५४६**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.